नियमित दिवाणी मुकदमा नं. ९/२०१६ मधील
निशाणी ४६ वरील आदेश

(तुळशीदास खोबरेकर वि. महेश वाडयेकर व.५)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी मयत मुळ वादी तुळशीदास मुकुंद खोबरेकर यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेला विलंब माफ होवून मिळणेकरिता केलेला आहे.

२. अर्जदार यांच्या मते सदर दाव्याचे कामकाज प्रलंबित असताना यातील मुळ वादी तुळशीदास मुकुंद खोबरेकर हे दिनांक ०४/०७/२०२४ रोजी मयत झालेले आहेत. मयत वादीचे वारस मुदतीत दाखल करणे आवश्यक होते. परंतु, दरम्यानच्या काळात मुळ वादी हेच या दाव्याचे सर्व कामकाज स्वतः जातीनिशी पहात होते. त्यामुळे त्यांनी दाखल केलेल्या या दाव्याविषयी वारस अर्जदार यांना माहिती नव्हती. सदरचा दावा वादी यांचे पुराव्यावर असल्याने याबाबत माहिती देणेकरिता त्यांचे वकीलांनी त्यांचेशी संपर्क साधला तेव्हा या न्यायालयामध्ये दाखल असलेल्या दाव्याबाबत अर्जदार यांना ज्ञात झाले. त्यामुळे वादी यांना सदरचा अर्ज दाखल करणेस सुमारे ९ महिने ५ दिवसांचा विलंब झालेला आहे. सदर विलंब माफ न झालेस वादीचे वारस रेकॉर्डवर न येता दावा अबेटेड राहून अर्जदार यांचे कधीही भरुन न येणारे नुकसान होणारे आहे. त्यामुळे अर्जदार यांनी मयत वादीचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेला विलंब माफ होवून मिळणेकरिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. प्रतिवादी यांनी निशाणी ४९ कडे त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत नोंदविलेली आहे. त्यांचे कथनाप्रमाणे प्रस्तुतचा अर्जदार यांचा अर्ज खोटा व खोडसाळ असून प्रतिवादीस मान्य व कबूल नाही. अर्जदार यांना प्रस्तुत दाव्याविषयी माहिती असून देखील त्यांनी दाव्यास विलंब व्हावा या हेतूने मुदतीत मयत मुळ वादीचे वारस अभिलेखावर आणलेले नाहीत. सबब, वादी यांच्या वारसांनी दिलेला अर्ज कायदेशीर नाही तरी तो फेटाळण्यात यावा अशी

विनंती प्रतिवादी यांनी केलेली आहे.

**४.** दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

**५.** अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठयर्थ अर्जदार यांनी आपले प्रतिज्ञापत्र प्रस्तुत अर्जासोबत अभिलेखावर दाखल केलेले आहे. दाव्याचा निकाल गुणदोषावर लागणेसाठी मयत मुळ वादी तुळशीदास मुकुंद खोबरेकर यांचे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाच्या आधारे वादीचा सदरचा अर्ज मंजुर करणेस कोणतीच हरकत दिसून येत नाही. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

| | **<u>आदेश</u>** |
|---|---|
| **१.** | प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणेत येतो. |
| **२.** | मयत मुळ वादी यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेला विलंब रक्कम रुपये २००/- (रुपये दोनशे मात्र) इतका खर्च आकारुन माफ करणेत येतो. |
| **३.** | खर्चाची रक्कम सरकार भरणा करावी. |

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

Digitally signed by KUMBHAR RANJANA GOVIND
Date: 2025.10.13 19:30:11 +0530

दिनांकः -१०/१०/२०२५. (श्रीम. आर.जी.कुंभार)

ठिकाणः- कुडाळ अति.सह दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर), कुडाळ.